**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक २५ मे २०२४**

**ठळक बातम्या**

- **निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
- **राज्य माध्यमिक मंडळाच्या दहावी परिक्षेचा निकाल 27 मे सोमवार रोजी दुपारी 1 वाजता होणार जाहीर.**
- **नागपूरच्या कळमना मार्केट येथे लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीची जय्यत तयारी.**

- **अकोला यवतमाळ आणि चंद्रपूर येथे पुढे तीन दिवस उष्णतेची लाट येण्याचा प्रादेशिक हवामान खात्याचा अंदाज.**

*****

पंतप्रधान मुलाखत

निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते आज बोलत होते. सरकार किंवा राजकीय पक्षांनी त्यांच्या कामाचा हिशेब जनतेला द्यावा, असं मत त्यांनी व्यक्त केलं. निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची एक प्रकारची संधी आहे असं मी मानतो. कोणत्याही प्रकारची टीका आपण गांभीर्यानं घेतो असंही पंतप्रधानांनी सांगितलं.

लोकसभा मतदान

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशभरात मतदान झाले. सहा राज्यं आणि दोन केंद्रशासीत प्रदेशातल्या ५८ मतदारसंघासाठी हे मतदान झाल. उत्तरप्रदेशातल्या १४, हरियाणातल्या सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी आठ, दिल्लीत सर्व ७, ओदिशामधल्या सहा, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी आज मतदान झाले. संध्याकाळी पाच

वाजेपर्यंत अंदाजे ५७.७० टक्के मतदान पार पडलं आहे. यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७७.९९ टक्के इतकं मतदान झालं आहे. झारखंड अंदाजे ६१.४१ टक्के, उत्तर प्रदेशमध्ये ५२.२ टक्क्यापेक्षा जास्त, बिहारमध्ये ५२.२४ आणि हरियाणामध्ये ५५.९३ टक्क्यापेक्षा जास्त मतदान झाल. तर जम्मू काश्मिरमध्ये ५१.३५ टक्क्यापेक्षा जास्त, दिल्लीमध्ये ५३.७३ टक्के तसच ओदिशामध्ये अंदाजे ५९.६० टक्के इतकं मतदान झालं आहे. निवडणुकीच्या या टप्प्यात अकरा कोटी मतदार, ८८९ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत.या टप्प्यात भाजपाचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनोहरलाल खट्टर, मनेका गांधी, मनोज तिवारी, तसंच काँग्रेसचे नेते दीपेंदर सिंह हुड्डा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार, निवडणुकीला सामोरे जात आहेत. जम्मू काश्मिरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती आणि समाजवादी पार्टीचे नेते धर्मेंद्र यादव हेही आपलं नशीब आजमावत आहेत.

निवडणूक कार्यालय स्पष्टीकरण

महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया संपूर्णपणे शांततेत आणि सुरळीत झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. मतदान प्रक्रिया बाधित होत आहे असे दाखवणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न होत असल्याचे दाखवणारे इतर राज्यांमधले काही जुने व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे प्रसारित केले जात असल्याचं निदर्शनाला आलं असून हे व्हिडिओ राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ शी संबंधित नसल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

दहावी निकाल

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळानं मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे, म्हणजे येत्या सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर केला जाणार आहे. मंडळाच्या mahahsscboard.in या संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी २८ मे २०२४ ते ११ जून २०२४ या काळात मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनं अर्ज सादर करता येणार आहेत.

मतमोजणी

नागपूर व रामटेक लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी कळमना मार्केट परिसरात जय्यत तयारी केली जात असून सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनातर्फे

दक्ष आहे. कळमना मार्केट मधील व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवसायाला आजवर कोणतीही बाधा येऊ न देता जिल्हा प्रशासनाने मतमोजणीच्या कामाची व्यवस्था व कामे पूर्ण करण्यावर भर दिला. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी काल प्रत्यक्ष कळमना मार्केटला भेट देऊन व्यापाऱ्यांशी संवाद साधत मतमोजणी केंद्राच्या पाहणी व सुरक्षिततेचा आढावा घेतला. येत्या 4 जूनला होणाऱ्या मतमोजणीत प्रारंभी पोस्टल बेलटची मतमोजणी होणार आहे. 500 बलेट पेपरसाठी एक टेबल याप्रमाणे 10 टेबल 10 अधिकारी राहणार आहेत. यावर सहाय्यक निवडणूक अधिकारी-कर्मचारी नियुक्त केले आहेत.

प्रबोधन कार्यक्रम

तथागत गौतम बुद्ध जयंती निमित्त शाहीर संभाजी भगत यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम आज सायंकाळी ६ वाजता उत्तर नागपूरातील भीम चौक,मोठा इंदोरा, नारा रोड, जरीपटका,इथे आयोजित करण्यात आला आहे.भीम चौक,नवयुवक संघटना यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचं आवाहन केलं आहे.

डेंग्यू नियंत्रण

डेंग्यू आजार विषाणूजन्य असून त्याचा प्रसार डासांमुळे होतो. डेग्यू नियंत्रणासाठी जनतेच्या सक्रीय सहभागाची आवश्यकता आहे. डेग्यू आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित सर्वेक्षण करुन डास अळ्या आढळून आललेल्या पाणी साठ्यात टेमीफॉस अळीनाशकाचे द्रावण टाकावे आणि कंटेनर रिकामे करावे. उद्रेकग्रस्त भागात शिघ्रताप सर्वेक्षण करावे. संशयित डेंग्यू आजाराच्या रुग्णांचे रक्तजल नमून घेऊन विषाणू परिक्षणासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रुग्णालय तसेच दटके प्रयोगशाळेत पाठविण्यात यावे. उद्रेकग्रस्त भागात धुर फवारणीच्या फेऱ्या आठवड्यात घेतल्या जाव्यात असं आवाहन नागपूर जिल्हा आरोग्य विभागातर्फे करण्यात आलं आहे.

पाणी टंचाई

उन्हाच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होऊ लागल्या असून गोंदिया जिल्ह्यात देखील आता पाणी टंचाई जाणवू लागली आहे. गोंदिया शहरातील अनेक भागातील नगरपरिषदेचे नळ कनेक्शन बंद असल्याने नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. या प्रमुख मागणीला घेऊन शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने नगरपरिषदेवर

धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी रस्ते दुरुस्तीच्या मागणीसह विविध मागण्यांचे निवेदन गोंदिया नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी यांना दिले आहे.

कारवाईची मोहीम

पुण्यातील ड्रंक अँड ड्राईव्ह प्रकरणानंतर यवतमाळ मध्ये वाहतूक पोलिसांनी सुसाट गाड्या चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. चालकाकडे परवाना नसल्यास मालकावर पाच हजार रुपये दंडात्मक कारवाई केल्या जात असल्याची माहिती यवतमाळचे वाहतूक पोलीस निरीक्षक अजित राठोड यांनी दिली आहे.

प्राणी गणना

बुलढाणा जिल्ह्यातील विस्तीर्ण अशा ज्ञानगंगा अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेच्या रात्री चंद्राच्या प्रकाशात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्राणी गणना करण्यात आली आहे. यावेळी झालेल्या प्राणी गणनेत ज्ञानगंगा अभयारण्यात तब्बल 20 बिबट 33 अस्वलांसाह अनेक वन्य प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे.

निधन

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढरकर यांचं काल नागपूरमध्ये निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. २०१६ पासून त्यांनी विको कंपनीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. त्यांच्या नेतृत्वात कंपनीनं कालसुसंगत बदल स्वीकारत प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले. त्यांच्याच कार्यकाळात कंपनीला इकॉनॉमिक टाइम्सचा २०२३ या वर्षाचा 'ब्रँड ऑफ द इअर' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला होता. पेंढारकर यांच्या पार्थिवावर नागपूरच्या अंबाझरी घाट इथं आज सकाळी अंत्यसंस्कार झाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पेंढरकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले असून विकोच्या माध्यमातून पेंढरकर यांनी आयुर्वेदिक उत्पादने परदेशात पोहोचवल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

स्वच्छ पेयजल उपक्रम

जसजसे तापमान वाढत आहे आणि उन्हाळा सुरू होत आहे, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने आपल्या गजबजलेल्या गाड्यातून प्रवास करणा-या प्रवाशांना गाड्या आणि प्लॅटफॉर्मवर पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने एक

अभिनव उपक्रम सुरू केला आहे. 14 एप्रिल पासून सुरू झालेला हा उपक्रम रेल्वे कर्मचारी आणि विविध नागरी संस्था यांच्यातील सहयोगी प्रयत्नांचा परिणाम आहे.

हवामान

देशाच्या उत्तर आणि वायव्य भागात उष्णतेची लाट सुरू आहे. हवामान विभागानं देशाच्या वेगवेगळ्या भागात रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत. राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगड, उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, मध्यप्रदेश आणि गुजरातमध्ये उष्णतेची तीव्र लाट, दोन ते तीन दिवस राहण्याची शक्यता आहे. केरळ, अंदमान - निकोबार बेटांचा समूह, कोकण, गोवा आणि विर्दभात पुढचे दोन दिवस जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. दरम्यान, नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने अकोला यवतमाळ आणि चंद्रपूर येथे पुढे तीन दिवस उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे 45 पुर्णांक 8 अंश सेल्सिअस करण्यात आली. नागपूरचे आजचे तापमान 42 पुर्णांक 6 अंश सेल्सिअस होते. पुढील काही तासात यवतमाळच्या तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता देखील आहे.

******